PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 5, ISSUE 2

# महात्मा गांधींच्या मिठाच्या सत्याग्रहात चंद्रपूर जिल्हयाचे योगदान

**प्रा. डॉ. कैलास रामचंद्र भांडारकर**
सहायक प्राध्यापक इतिहास विभाग
शिवाजी महाविदयालय गडचिरोली
जिल्हा गडचिरोली. **महाराष्ट्र भारत**

महात्मा गांधीनी असहकार आंदोलनानंतर इ.स.१९३० मध्ये दुस-या व्यापक एक आंदोलणाला प्रारंभ केला ते आंदोलण सविनयकायदेभंग आंदोलन म्हणून प्रसिध्द आहे. २९ डिसेंबर १९२८ ला पं. मोतीलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली कॉग्रेसचे ४३ वे अधिवेशन कलकत्ता येथे भरले त्यात एक वर्षाच्या आत म्हणजे ३१ डिसेंबर १९२९ पर्यंत वसाहतीचे स्वराज्य सरकारने दिले नाही तर सविनय कायदेभंगाचा कार्यक्रम हाती घेवून कायदेभंगाची चळवळ चालू करावी असा ठराव पास झाला. २ जानेवारी १९३० ला कॉग्रेस कार्यकारीणीची बैठक घेवून त्यात महात्मा गांधींना सविनय कायदे भंग चहवळीचा कार्यक्रम निश्चित करण्याचा अधिकार देण्यासंबंधी ठराव एकमताने पास झाला [१] आणि ३० जानेवारी १९३० ला महात्मा गांधीनी सविनय कायदेभंग चळवळीची घोषना केली.[२]

सविनय कायदेभंग चहवळीच्या अंतर्गत महात्मा गांधी मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी दांडी यात्रेला निघाले. आपण अंतिम युध्दावर जात असून स्वातंत्र जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत साबरमती आश्रमाला परतणार नाही. अशी त्यांनी प्रतिज्ञा केली.[३] १२ मार्च १९३० रोजी महात्मा गांधींनी आपल्या ७८ सहका-याबरोबर साबरमतीवरुन आपल्या प्रसिध्द दांडी यात्रेचा श्रीगणेशा केला.[४] त्यात महाराष्ट्रातील १३ स्वातंत्रसैनिकापैकी चंद्रपूर जिल्हयातील मूल या गावचे गजाननराव गव्हाणकर सहभागी झाले होते.[५] मुख्य पुढा-यांना अटक करण्यात आल्यानंतर चळवळ तत्वनिष्ठ कॉग्रेसच्या कार्यकर्तयांनी पुढे चालू ठेववी असा आदेश त्यांना देण्यात आला होता [६]. मिठाचा सत्याग्रह हा स्वातंत्र

चळवळीचा प्रतिकात्मक लढा होतो. ६ एप्रिल १९३० रोजी सकाळी गांधीजी सहका-यासोबत समुद्रात स्नानाला उतरले व मिठ उचलून कायदेभंग केला या त्यांच्या क्रातीमुळेच देशभरात कायदेभंगाचा लढा सुरु झाला.[७] म. गांधीनी भारतीय स्त्रियांना १० एप्रिल १९३० च्या यंग इंडिया च्या लेखातून पिकेटींग व सुत कातण्याचे कार्य हाती घेण्याची विनंती केली. त्यामुळेच स्त्रिया भारतीय स्वातंत्र आंदोलनात सहभागी झाल्या.[८]

संपूर्ण भारतात भिन्न भिन्न ठिकाणी सरकारी कायदेभंग करण्यात येउ लागले. सरकार कायदे मोडणा-यांना तुरुंगात डांबत होते. तरीदेखील जनता सरकारचे कायदे मोडण्यास भित नव्हती. १९२० च्या मानाने १९३० मधील सत्याग्रहाची संख्या अनेक पटीने वाढली.[९] भारतातील सर्व कॉग्रेस समित्या युध्दमंडळाच्या स्वरुपात परावर्तीत झाल्या होत्या. इंग्रजांशी लढल्या गेलेले हे एक अहिंसात्मक युध्द होते. नागपूर युध्दमंडळाचे अध्यक्षपद नरकेसरी अभ्यंकर यांना देण्यात आले.[१०] चंद्रपूर जिल्हयाला देखील या कायदेभंगाच्या लढयाने प्रभावित केले.

चंद्रपूरला सुध्दा चांदा तालुका कॉग्रेस कमेटी निर्माण करण्यात आली त्याचे सुत्रधार मा.सा. कन्नमवार होते. अध्यक्ष बाबा पाटील दीक्षीत तर बाजीराव फुलझेले हे दुसरे सचिव असून या युध्दमंडळाचे कार्यालय जैन मंदिराच्या माडीवर होते.[११] लाहोर कॉग्रेस अधिवेशनाला सेठ खुशालचंद खजांची, जगदीशराव साळवे व लालमियॉ ठेकेदार हे उपस्थित राहून चंद्रपूरला परतल्यानंतर त्यांनी चंद्रपूर जिल्हयात कायदेभंग चळवळीच्या तत्वाच्या प्रसाराचे कार्य हाती घेतले. त्यांच्या सोबतीला मा.सा. कन्नमवार,निलकंठराव देवतळे, बाजीराव फुलझेले व बाबा पाटील दिक्षीत यांनी देखल प्रचारकार्यात भाग घेतला.[१२] त्याच्या प्रचार कार्यामुळे या कालावधीत महात्मा गांधीच्या अकरा मागण्याचे स्वर अख्या चंद्रपूर जिल्हयाभर ऐकावयास येत होते. तर पं. बालगोंविंद तिवारीच्या नेतुत्वाखाली संपूर्ण चंद्रपूर जिल्हयात सत्याग्रह चळवळीला जोम चढला होतो.[१३]

मिठाच्या सत्याग्रहाने ब्रिटीश शासनाला जबरदस्त धक्का बसला. सरकारने चळवळ दडपून टाकण्यासाठी दमन मार्गाचा अवलंब केला. गांधीजी व त्यांच्या सहका-यांना अटक करण्यात आली. पण दडपशाहीमुळे लोक अधिक खवळले त्यामुळे चळवळीला अधिक गती प्राप्त झली.[१४] गांधीजीच्या अटकेची प्रतिक्रिया चंद्रपूर जिल्हयात उमटली चंद्रपूरातील गांधी चौकात कॉग्रेस कार्यकत्यांनी सभा घेवून इंग्रज सरकारचा कडक निषेध केला.[१५]

सरकारच्या दडपशाहीला कॉग्रसने कृती करुन तोंड दिले. प्रांतिक आणि जिल्हा कॉग्रेस कमेटया बरखास्त करुन त्याऐवजी युध्द मंडळाची स्थापना करण्यात आली.[१६]

६ एप्रिलला जेव्हा गांधीजींनी दांडी येथे मिठ कायादाभंग केल्यानंतर मध्यप्रांत व व-हाडात या चळवळीची सुरुवात झली. व-हाडचे नेतत्व वीर वामनराव जोशी तर नागपूरचे नेतत्व पूनमचंद राका यांचेकडे होते.[१७]

चंद्रपूरला देखील चांदा युध्दा मंडळ निर्माण करण्यात आले. त्यांचे सूत्रधार मा.सा. कन्नमवार तर अध्यक्ष बाबा पाटील दिक्षीत होते.[१८]

**धारासना सत्याग्रहात चंद्रपूर जिल्हयाचा सहभाग -**

६ एप्रिल १९३० रोजी दांडी येथे मिठाचा कायदा मोडल्यापासून देशभरात कायदेभंगाला सुरुवात झाली. गुजरातमधील सूरत जिल्हयातील धारासना येथे मिठाचा सत्याग्रह करण्यात आला. त्या सत्याग्रहाला सरोजीनी नायडूंचे नेतत्व लाभले होते. येथील सत्याग्रहींवर लाठयांचे वर झाले. सत्याग्रही घायाळ होवून पडले. परंतु प्रतिकाराकरीता कुणही हात वर केला नाही.[१९] या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी चंद्रपूर युध्दमंडळाने 3 लोकांची एक तुकडी पाठविण्याचे ठरविले. त्यात जगदीशराव साळवे, के.टी.गव्हाणकर व राजेश्वरराव देशमुख यांचा समावेश होता.[२०] सत्याग्रहींना निरोप देण्यासाठी एक विशाल मिरवणूक काढण्यात आली या मिरवणूकीच्या अग्रभागी तीनही सत्याग्रही गणवेशात व हातत तिरंगी झेंडे धरुन चालत होते. या मिरवणूकीत भगवतीप्रसाद मिश्र, खुशालचंद खजांची, कन्नमवार, गोंविंदराव याज्ञिक व चंद्रपूर जिल्हायातील खेडयापाडयातील लोक सहभागी झाले या मिरवणूकीतल जनसमुदाय –

महात्मा गांधी की ग्यारह शर्ते
अमल मे लाकर दिखाना होगो/
तुझे सितमगर प्रजा के आगे
यह सिस अपना झुकाना होगा//

हे गीत गात होते. तर श्रीमती गोपिकाबाई कन्नमवार श्रीमती याज्ञिक "बंधुनो

महात्मा गांधींचा इसारा एका प्रेमाचा "

हे गीत गात रस्ता पदाक्रांत करत होत्या. मधेमध्ये महात्मा गांधी की जय अशा घोषणा केल्या जावून या मिरवणुकीचे पुढे एका भव्य सभेत रुपांतर झाले. त्या सभेचे अध्यक्ष चंद्रपूर जिल्हा युध्द मंडळाचे अध्यक्ष बाबा पाटील दिक्षीत (बाबा पाटील उर्फ शालीग्राम दीक्षीत) यांना नेमण्यात आले. या सभेत सत्याग्रहींना धारासना सतयाग्रसाठी एकत्रित जनसमुदायाने निरोप दिला. त्यावेळी सत्याग्रही जगदीशराव साठवे म्हणाले, भारताच्या स्वातंत्र लढयात आम्ही चंद्रपूर जिल्हयाला पहिल्या रांगेत ठेवू.[२१] ज्या दिवशी जगदीशराव साळवे धारासना सत्याग्रहास जाण्यास निघाले त्याच दिवशी त्यांच्या नवजात मुलाच्या नामकरण विधीचा कार्यक्रम होता. तरीही त्यांनी देशप्रेमापोटी त्याकडे दुर्लक्ष केले आणि तुकडीसोबत सत्याग्रहास रवाना झाले. तेव्हा तानाजीच्या कार्याची आठवण जनसमुदायाला झली व त्यांनी त्याच क्षणी जगदीशराव साठवे यांना तानाजी (सिंहगड) ही उपाधी दिली.[२२] (तानाजीने मुलाचे लग्न समोर असून देखील कोंढाणा किल्ल्यावर स्वारी केली होती) चंद्रपूरकर सत्याग्रहींची तुकडी नागपूर येथून सहस्त्रबुध्दे यांच्या नेतत्वाखाली धारासनाला जाणा-या तुकडीत सहभागी झाले.[२३] ठरलेल्या कार्यक्रमानुसार ही तुकडी धारासनाला रवाना झाली पण रेल्वे गाडी भुसावळ येथे पाहोचताच सरकारने त्यांना अडविले व त्यानंतर त्यांना मोटारीने जळगावला पाहोचविण्यात आले. तेथे त्यांच्यावर खटले भरण्यात आले. चंद्रपूरच्या जगदीशराव साळवे, राजेश्वरराव देशमुख व के.टी. गव्हाणकर यांच्या १४३ ई.पी. कोड लावून खटले चालविण्यात आले. त्यात साळवेंना सोडपाच महिन्यांची,[२४] के.टी.गव्हाणकरांना सहा महिन्यांची[२५] तर राजेश्वरराव देशमुखांना सहा महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली. त्यांना धुळे येथील तुरुंगात ठेवण्यात आले. पुढे साळवे व देशमुख यांना येरवाडा जेलमध्ये पाठविण्यात आले तर प्रकृती ठीक नसल्यामुळे गव्हाणकरांना धुळेच्या तुरुंगातच राहावे लागले.[२६]

**विलेपार्ले येथील सत्याग्रहात चंद्रपूरचा सहभाग** –

अशाच प्रकारचा सत्याग्रह मुंबईच्या उपनगरात विलेपार्ले या ठिकाणी घडून आला. गांधीजींना कार्यकत्यांनी त्या सत्याग्रहाचे उद्घाटन करण्याची विनंती केली. तेव्हा गांधीजींनी मुंबईचे प्रथम डिक्टेटर म्हणून वर्ध्याचे जमनालाल बजाज यांची नियुक्ती केली.[२७] या सत्याग्रहासाठी महाराष्ट्रातील ब-याच जिल्हयातील सत्याग्रही ५ एप्रिललाच येवून होते. 6 एप्रिलला समुद्रातून पाणी आणून ते सिमेंटच्या कुंडयात आटवून मिठ तयार करण्यात आले. यावेळी जमनालाल बजाज, मशरुवाला,के.एम.नरीमन यांना अटक करुन दोन वर्षाची शिक्षा देण्यात आली.[२८] या मिठ सत्याग्रहात

भाग घेण्यासाठी चंद्रपूर जिल्हयातून पं. बालगोविंद तिवारी यांनी भाई पैकन पाडगेलवार, जयराम भिवाजी कुडे आणि भद्रावातीचे लक्ष्मणराव बेलदार यांना पाठविले.[२९] या सत्याग्रहात भाई पेकन पाडगेलवार यांनी मिलटरी कॅम्पमध्ये कॉग्रेस बुलेटिन वाटप केले व झेंडा रोवला त्यामुळे इंग्रज सैनिकांनी त्यांना भयंकर मारले व पोलिसांच्या स्वाधीन केले.[३०] या चंद्रपूर जिल्हयातील तिनही सत्याग्रहींवर १३१ व ११४ इ.पी. कोड च्या अंतर्गत खटले चालविण्यात आले व त्यांना शिक्षा देण्यात आली. ज्यावेळी त्यांची तुरुंगवासातून सुटका झाली तेव्हा पं. बालगोविंद तिवारींनी राजमल पुगलियांच्या घोडागाडीवर त्यांची मिरवणूक काढून त्यांचे भव्य स्वरुपात स्वागत केले.[३१]

**दहीहांडा सत्याग्रहात चंद्रपूर जिल्हयाचा सहभाग** –

विदर्भाला समुद्र किनारा उपलब्ध नसल्याने समुद्रातील पाण्याचे मिठ कसे तयार करता येईल हा प्रश्न वैदर्भीय नेत्यांपुढे निर्माण झाला. तेव्हा तत्कालीन कॉग्रेस पुढा-यांनी हा प्रश्न वेगळया मार्गाने सोडविला.[३२] अकोला जिल्हयातील अकोट तहसिलमध्ये ३-४ मैलावर खा-या पाण्याच्या विहिरी आहेत. तेथील पाणी काढून ते आटवून मिठ तयार करण्याचे सत्याग्रह केंद्र हे नागविदर्भाकरीता ठरविण्यात आले. नागपूरहून सहस्त्रबुध्दे यांच्या नितृत्वाखाली एक तुकडी 9 एप्रिल 1930 रोजी निघाली. त्यांनी दहीहांडा येथील खा-या पाण्याच्या विहिरीून पाणी आटवून १३ एप्रील १९३० रोजी मिठाचा कायदे भंग केला या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी चंद्रपूर कडून एक तुकडी पाठविण्यात आली होती. त्यांनी दहिहांडा येथे येवून सरकारचा कायदा भंग केला.[३४] १३ एप्रिल १९३० रोजी पं. जवाहरलाल नेहरु मध्येप्रदेश साहित्य संमेलनासाठी येण्यास इलाहाबाद जवळील छीक्की रेल्वे स्थानकावर रेल्वेमध्ये बसून जात असतांना त्यांना ब्रिटीश सरकारने अटक केली आणि नैनी येथील मध्यवर्ती तुरुंगात ठेवले.[३५] त्यांच्या अटकेविरुध्द संपूर्ण देशभरात हरताळ पाळण्यात आली.[३६] याचे पडसाद चंद्रपूर जिल्हयातील प्रमुख नगरात उमटून हरताळ पाळण्यात आला. या हरताळ प्रसंगी चंद्रपूरला मा.सा. कन्नमवार यांना अटक करण्यात येवून त्यांना एक वर्षाच्या करावासाची शिक्षा व दंडही ठोठावण्यात आले. तसेच डिस्ट्रिक्ट कौन्सीलमधील नोकरीवरुन देखील काढून टाकण्यात आले.[३७]

यापुढे दहीहांडा येथून तालुक्याच्या ठिकाणी पाणी आणून मिठ सत्याग्रह झाले.[३८] खुशालचंद्र खजांची,अंबादस पट्टेवाले आणि मनोहरसिंग यांनी दहीहांडा येथून आणलेल्या पाण्याचे चंद्रपूर येथील नगर भवनातील सार्वजनिक सभेत २७ एप्रिल १९३० रोजी मिठ तयार करण्यात आले. या सभेला १०००

लोक उपस्थित होते प्रत्येक मिठाची पुडी एक आण्याला विकण्यात आली.[३९] चंद्रपूरचे खुशालचंद खजांची व महेशदास यांनी कोठारी व तोहोगांव येथे मिठाचा कायदा मोडला.[४०]

दिनांक २८ एप्रिल १९३० रोजी चंद्रपूर येथील टिळक मैदानावर नागपूर प्रांतातील युध्द मंडळातर्फे सेठ खुशालचंद यांचे अध्यक्षतेखाली सभा होवून दहीहांडा येथून आणलेल्या पाण्याचे मिठ तयार करण्यात आले. मिठाची जाहीर विक्री करण्यात आली ब-याच लोकांना मिठ मिळू शकले नाही.[४१]

वरोरा येथे निळकंठराव देवतळे यांच्या अध्यक्षतेखाली गांधी चौकात सभा झाली त्या सभेत दहिहांडा येथून आणलेल्या खा-या पाण्याचे मिठ तयार करण्यात आले. तीन मिठाचे पुडके ९ रुपयात विकण्यात आले.[४२]

महात्मा गांधीना ५ मे १९३० रोजी ब्रिटीश सरकारने अटक केली त्या दिवशी वरोरा व मूल येथे राष्ट्रीय ध्वज हातात धरुन मिरवणूक काढण्यात आली. मूल येथील ऑनररी मॅजिस्ट्रेट श्री काशीराव फडणवीस यांनी सभेचे अध्यक्षपद भूषविले या सभेला ६०० लोक उपस्थित होत. सभेत सरकारच्या दडपशाही धोरणाचा निषेध करण्यात आला लोकांना दारु व परदेशी कापडावर बहिष्कार टाकण्याची विनंती करण्यात आली. तसेच खादीचा वापर करण्यावर भर देण्यात आला. या सभेत ब-याच व्यापा-यांनी सहा महिण्याकरीत परदेशी कापड न विकायचे ठरविले.

अशा प्रकारे महात्मा गांधीनी भारताला स्वातंत्र मिळवून देण्यासाठी सुरु केलेलय मिठाच्या सत्याग्रहात चंद्रपूर जिल्हयातील जनतेने हिरहिरीने भाग घेतल्याचे सिध्द होते.

## संदर्भ

१. Nehru Jawaharlal An Autobigraphy - Published by Jawaharlal Neharu memorial fund Delhi 1980 P.No. 208

२. Pattabhi sitarammayya History of Indian National- congress Vol.I & II S. Chand & Co. New Delhi 1969 P.No. 366

३. पाठक डॉ. दमयंती वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र संग्रामातील योगदान - मंगेश प्रकाशन नागपूर, २००३ पा. ६५

४. बिपन चंद्र (मराठी अनूवाद डॉ.एम.व्ही काळे) भारताचा स्वातंत्र संघर्ष के

सागर प्रकाशन पूणे, २००३ पा. ३१८
५. दै. लोकमत दि. २९/८/२००६ पा. १६
६. Pattabhi Sitarammayya P. 378
७. मिश्रा व्दारका प्रसाद मध्यप्रदेश स्वाधीनता आंदोलन का इतिहास -मध्यप्रदेश शासन भोपाल २००३ पा.४००
८. Mujumdar R.C. History of the Freedam movement in India Vol. III Frima, K.S. Mukhopadhya colcatta 1963 P. 340
९. वक्कानी नि.आ. लोकसत्ता मधील लेख २९/७/१९९७
१०. कित्ता
११ काटकर तू.ना. , प्रा. गुप्त रमेश चंद्रपूरचा सिंह - नवजिवन प्रकाशन चंद्रपूर १९७१ पा.४२
१२ मिश्रा प. भगवतीप्रसाद भारतीय स्वतंत्र संग्राम में चंद्रपूर- रमा प्रकाशन चंद्रपूर १९८६ पा. १६७-६८
१३ कित्ता
१४ Mujumdar R.C. P. 340
१५ काटकर तु.ना., प्रा.गुप्त रमेश चंद्रपूरचा सिंह पा.४२
१६ कुंटे भ.ग. स्वातंत्र सैनिक चरित्र कोष विदर्भ विभाग खंड १- दार्शनिक विभाग महाराष्ट्र शासन मुंबई १९७६ पा.१७
१७ मिश्रा व्दारका प्रसाद पा. ४०१
१८ मिश्रा पं. भगवती प्रसाद पा.१६९
१९. पाठक डॉ. दमयंती पा. ६६
२० काटकर तु.ना. कन्नमवार चरित्र -श्रीमती गोपीकाबई कन्नमवार, भुलाभाई देसाई रोड मुंबई १९६४ पा. १९
२१ मिश्रा पं. भगवती प्रसाद पा. १६९
२२ कित्ता पा. १६९-७०
२३ कानेटकर मा.ज. भाग ३ प्रकरण पहिले पा. ३
२४ मिश्रा पं. भगवती प्रसाद पा.१७०

२५ फाटक न.र. स्वातंत्र सैनिक चरित्र कोष विदर्भ विभाग खंड १ भारतीय स्वतंत्रता आंदोलन इतिहास समिती म.रा. मुबंई १९७१ पा.२४६

२६. मिश्रा पं. भगवती प्रसाद पा.१७०

२७ चौधरी के.के. भारतीय स्वतंत्रता संग्राम और महाराष्ट्र प़.७६

२८ कित्ता

२९ मिश्रा पं. भगवती प्रसाद पा.१७१

३० राजूरकर अ.ज. चंद्रपूरचा इतिहास शारदा प्रकाशन चंद्रपूर १९५६ पा.३३०

३१ मिश्रा पं. भगवती प्रसाद पा.१७१

३२ वक्कानी नि.आ. आधुनिक विदर्भ का इतिहास मंगेश प्रकाशन नागपूर १९८५ पा.१३५

३३ अंधारे डॉ. भारतचंद्र रामचंद्र संशोधन सिंपले भाग २ विश्वभारती प्रकाशन नागपूर १९९९ प़.७५

३४ K.K. Chaudhari Civil Disobedience movement April September 1930 Vol XI Govt. of Maharashtra Bombary 1990 P.No. 909

३५ मिश्रा व्दारका प्रसाद पा.४०२

३६ कन्नमवार मा.सा. पूज्य पंडीतही चांदा

३७ वासाडे डॉ. प्रभा लोकनेते कन्नमवार हरिवंश प्रकाशन चंद्रपूर पा. १०

३८ पाठक डॉ. दमयंती पा.६८

३९ Choudhari K.K. Vol. XI P.No.902

४० Hitwada 1 May 1930 P. 9

४१ Chaudhauri K.K. Vol XI P.No. 902

४२ कित्ता पा. ९४५